नि.फौ.ख.क्र.६२/२०२३
नि.क्र.२१

**सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याव्दारे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतो की,

**नाव** – प्रतिक साहेबराव नाळे

**वय** – २० वर्षे, **व्यवसाय** – शिक्षण

**राहणार** – वडले, ता. फलटण, जि. सातारा

**सहा. सरकारी अभियोक्ता श्री.पी.व्ही.महाले यांच्यामार्फत सरतपास शपथेवर सुरु**

१. आरोपी माझा चुलत भाऊ आहे. वडले गावात वांजळे वस्ती येथे आमची शेती आहे. दि.१४.०१.२०२२ रोजी सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास उंबराच्या ताळीत घटना घडली होती. त्यावेळी मी व माझे वडील आमच्या शेतात काम करत होते. माझी आई दुसऱ्या शेतामध्ये काम करत होती. त्यावेळी आईचा ओरडण्याचा आवाज आला. माझे वडील त्या दिशेने गेले. त्यांच्या पाठोपाठ मीदेखील तिकडे गेलो. तेव्हा निखील नाळे हा माझ्या आईला हाताने लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होता. माझे वडील आईला सोडवायला गेले तेव्हा माझ्या वडीलांनादेखील निखील नाळे मारहाण करु लागला. मी त्याला सांगितले की, तु असे काही करु नको. परंतू, तो थांबत नव्हता, म्हणून मी पोलीस स्टेशनला फोन लावीन असे निखील नाळेला सांगितले. तेव्हा तो निघून गेला. मी आईला भांडणाचे कारण विचारले तेव्हा आईने सांगितले की, निखील नाळेने फोन करुन आत्याच्याविरुध्द केलेली केस माघारी घे, म्हणून माझ्या वडीलांना धमकी दिली होती. तेव्हा माझ्या वडीलांनी निखील नाळेच्याविरुध्द एन.सी.केली होती, त्याचा राग मनात धरुन आरोपीने भांडण केले. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे. भांडण झाल्यानंतर आम्ही पोलीस स्टेशनला तक्रार द्यायला गेलो होतो.

**सरतपास पूर्ण.**

**आरोपीतर्फे नि.२० वरील आदेशानुसार सदर साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात येत आहे.**

श्रवणोत्तर स्विकृत. समक्ष

**Sd/-**

**ठिकाण** : फलटण
श्रीमती.जे.एस.खेडकर–गोयल,

**दिनांक** : ०८.०९.२०२५
**न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**

**आरोपीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री.डी.एस.टाळकुटे यांचेमार्फत उलटतपास शपथेवर सुरु**

२. मी बी.ए.प्रथम वर्षात शिक्षण घेत आहे. वर्षा व ऋतुजा माझ्या बहिणी आहेत. सुशिला घनवट ही माझी आत्या आहे व स्वाती धनंजय घनवट ही माझ्या आत्याची मुलगी आहे. दिनकर नाळे व राजाराम नाळे यांनी माझ्या वडीलांविरुध्द वाटपासाठी दावा दाखल केलेला आहे. हे मला माहित नाही की, त्या दाव्याचा निकाल दिनकर नाळे व राजाराम नाळे यांच्या बाजूने लागला व त्यांनी सातारा न्यायालयात अपील दाखल केले होते. हे मला माहित नाही की, माझ्या वडीलांनी जमीनीसंदर्भात / दाव्यासंदर्भाम मा. उच्च न्यायालयात अपील दाखल केले होते किंवा कसे. जमीनीवरुन आमचे वाद आहेत. हे म्हणणे खरे आहे की, शिक्षण व इतर बाबींविषयी आमच्या घरामध्ये चर्चा होत असते. हे म्हणणे खरे आहे की, वडील ठरवतात त्याप्रमाणे पुढील कार्यवाही होत असते. गट नं.२१९ हा माझ्या आईच्या नावावर आहे. तो गट कधी व कोणाकडून खरेदी केला हे मला सांगता येणार नाही. हे मला माहित नाही की, त्या गटात दिनकर नाळे, राजाराम नाळे, सुशिला घनवट, सुरेखा कर्णे यांची नांवे आहेत.

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने सन २०२१ च्या दिवाळीच्या वेळेस वडीलांविरुध्द फलटण ग्रामीण येथे तक्रार दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे गट नं.२१९ चे वाटप वाटून दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीलादेखील त्याचे क्षेत्र वाटून दिलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनकर नाळे हे त्यांच्या घरी एकटेच राहतात. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने माझ्याविरुध्द तसेच आई, वडील, बहिणीविरुध्द फलटण न्यायालयात केस दाखल केली होती. साक्षीदार सांगतो की, त्या केसचा निकाल झालेला आहे. आरोपीने फोन करुन आत्याच्याविरुध्द केलेली केस माघारी घे म्हणून माझ्या वडीलांना धमकी दिली होती, तेव्हा माझ्या वडीलांनी आरोपींविरुध्द एन.सी.दाखल केली होती त्या एन.सी.चा क्रमांक मला सांगता येणार नाही. साक्षीदार सांगतो की, ती एन.सी. आजरोजी दाखल केलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासात सांगितलेली घटना घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझे वडील आईला सोडवायला गेले तेव्हा माझ्या वडीलांनादेखील निखील नाळे मारहाण करु लागला हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला वाटप करुन द्यावे लागू नये म्हणून आम्ही सर्वांनी आरोपीविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, स्वाती घनवट यांनी माझ्याविरुध्द फलटण ग्रामीण पोलीस स्टेशनला तक्रार केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत.                                        समक्ष

**Sd/-**

**ठिकाण** : फलटण                    श्रीमती.जे.एस.खेडकर-गोयल,

**दिनांक** : १९.०१.२०२६                    **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, फलटण.**